[illegible] व वाणिज्य महाविद्यालय

ओझर (मिग) च्या वरिष्ठ महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीची सभा आज मंगळवार १० मे, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त खालील प्रमाणे —

सभेस खालील पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

| अ.नं | नांव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १ | मा. श्रीमती नीलिमाताई वसंतराव पवार | अध्यक्षा | [signature] |
| २ | मा. श्री. विठ्ठलराव त्र्यंबक चौधरी | सदस्य | [signature] |
| ३ | मा. श्री. रत्नाकर विनायकराव कदम | —"— | |
| ४ | मा. श्री. चंद्रभान बाबुराव बोरस्ते | —"— | [signature] |
| ५ | मा. श्री. भास्करराव बबनराव गायधे | —"— | [signature] |
| ६ | मा. श्री. अरुण भाऊराव कदम | —"— | |
| ७ | मा. श्री. विष्णु कचरू शेजवळ | —"— | |
| ८ | मा. श्री. रामनाथ कचरू वाबळे | —"— | [signature] |
| ९ | मा. श्री. कोंडाजी शिवराम चौधरी | | |
| १० | मा. प्राचार्य डॉ. अर्जुन पंडित पाटील | सचिव | Patil |
| ११ | मा. प्रा. श्री. रमाकांत हंसराज ठाकरे | प्रा. प्रतिनिधी | [signature] |
| १२ | मा. प्रा. श्रीमती शकुंतला नाना पुरकर | —"— | [signature] |
| १३ | मा. प्रा. श्री. प्रदीपकुमार रघुनाथ भदाणे | —"— | [signature] |
| १४ | श्री. लक्ष्मण संतू लिडके | प्राध्यापकेतर प्रतिनिधी | [signature] |
| १५ | मा. प्रा. श्रीमती एस. टी. वाघ | निमंत्रित | [signature] |

दुःखद निधन

ठराव क्र. १ : मविप्र संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ. दौलतराव सोनुजी आहेर तसेच ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे दुःखद निधन झाले त्याबद्दल ही सभा शोक व्यक्त करीत आहे.

विषय क्र. १ : मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव क्र. २ : मागील सभा दि. १०/१०/२०१५ चे इतिवृत्ताचे वाचन समितीचे प्राध्यापक प्रतिनिधी तथा उपप्राचार्य श्री. रमाकांत हंसराज ठाकरे यांनी केले त्यावर साधक-बाधक चर्चा होवून इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक - श्री. रत्नाकर विनायकराव कदम

अनुमोदक - श्री. प्रदीपकुमार रघुनाथ भदाणे

विषय क्र. २ : महाविद्यालयाचे पहिल्या मजल्यावरील पूर्णत्वाचे मार्गावर असलेल्या वाढीव इमारत बांधकामाचा आढावा घेणे.

ठराव क्र. ३ : महाविद्यालयाचे पहिल्या मजल्यावरील वाढीव ८६४.६६ स्क्वे. मी. वाढीव बांधकाम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. सदरचे काम सन २०१६-१७ चे शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी पूर्ण होवून महाविद्यालयाचे वापरास मिळणेसाठी कॉन्ट्रॅक्टरकडे पाठपुरावा करण्यात यावा असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक - श्री. चंद्रभान बाबुराव बोरसे

अनुमोदक - श्री. रामनाथ कचरू वाबळे

विषय क्र. ३ : लायब्ररी शेजारील पॅसेजमधील जुनी खराब फरशी बदलून नवीन बसविणे.

ठराव क्र. ४ : महाविद्यालयाचे पहिल्या मजल्यावरील लायब्ररी शेजारील पॅसेजमधील जुनी फरशी खराब झाली आहे. त्याची पाहणी सभा सुरु होण्यापूर्वी करण्यात आली असून सदरची फरशी बदलून घेण्याचे काम मे. कार्े कन्स्ट्रक्शनकडून करून घेण्यात यावे. तत्पूर्वी त्या कामास संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयाची परवानगी घेण्यात यावी असा ठराव ही सभा मंजूर करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक- प्रा. श्री. रमाकांत हंसराज ठाकरे

अनुमोदक- श्री. रत्नाकर विनायकराव कदम

विषय क्र. ४ : लायब्ररी ऑडीटोरीयमच्या वरील मोठ्या हॉलमध्ये स्थलांतरीत करणे.

ठराव क्र. ५ : महाविद्यालयाचे ग्रंथालयासाठी फारच अपूरी अशी जागा असल्याने ग्रंथालय महाविद्यालयाचे पहिल्या मजल्यावरील ऑडीटोरीयमच्या वरील मोठ्या हॉलमध्ये स्थलांतरीत करण्यास व जुन्या जागील स्टडी रूम तयार करण्यात यावा असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर
सूचक - श्रीमती शकुंतला नाना पुरकर
अनुमोदक - श्री. चंद्रभान बाबुराव बोरसे

विषय क्र. ५ : नवीन बांधलेल्या खोल्या, प्रयोगशाळा, गेस्टरूम व टॉयलेटमध्ये इलेक्ट्रिक फिटींग करणे.

ठराव क्र. ६ : महाविद्यालयाचे इमारतीचे पहिल्या मजल्यावरील नवीन बांधलेल्या वाढीव बांधकामाच्या खोल्या, प्रयोगशाळा, गेस्टरूम व टॉयलेटमध्ये इलेक्ट्रीक फिटींग करण्यासाठी संस्थेच्या इंजीनिअरकरून पाहणी करून त्याचे टेंडर व वर्क ऑर्डर काढण्याची प्रक्रीया सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर
सूचक - श्री. रामनाथ कचरू वाबळे
अनुमोदक - श्रीमती शकुंतला नाना पुरकर

विषय क्र. ६ : नवीन वाढीव बांधकामामध्ये लाईट व फॅन बसविणे.

ठराव क्र. ७ : महाविद्यालयाचे इमारतीचे पहिल्या मजल्यावरील नवीन वाढीव बांधकामाच्या खोल्या, प्रयोगशाळा, गेस्टरूम व टॉयलेटमध्ये इलेक्ट्रीक फिटींग झाल्यानंतर संस्थेच्या परवानगीने लाईट (एलईडी ट्यूब) व फॅन बसविण्यात यावे असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर
सूचक - श्री. चंद्रभान बाबुराव बोरसे
अनुमोदक - श्री. प्रदीपकुमार रघुनाथ भदा

विषय क्र. ७ : नवीन बांधलेल्या पदार्थविज्ञान प्रयोगशाळेच्या भिंतीवर शोकेश बसविणे

ठराव क्र. ८ : नवीन बांधलेल्या पदार्थविज्ञान प्रयोगशाळेच्या भिंतीवर शोकेश बसविणे (आधुनिक टाईपचे शोकेश तयार करून बसविण्यात यावे) असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक- श्री. प्रदीपकुमार रघुनाथ भदाणे

अनुमोदक- श्री. रामनाथ कचरु वाबळे

विषय क्र. ८ : पिण्याच्या पाण्याचे दोन प्युरिफायरसह कुलर बसविणे

ठराव क्र. ९ : महाविद्यालयाचे इमारतीतील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय होण्यासाठी दोन प्युरिफायरसह कुलर बसविणे आवश्यक आहे. त्यासाठी माजी विद्यार्थ्यांना आवाहन करून निधी मिळविण्यात यावा व त्यातून सदरची सुविधा करण्यात यावी असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक- श्री. रत्नाकर विनायकराव कदम

अनुमोदक- श्री. चंद्रभान बाबुराव बोरसे

विषय क्र. ९ : शैक्षणीक वर्ष २०१६-१७ चे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत विचारविनीमय करणे.

ठराव क्र. १० : शैक्षणीक वर्ष २०१६-१७ चे इ. ११ वी व वरीष्ठ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रीया संस्थेच्या धोरणानुसार ऑनलाईन पार पाडण्यात यावी असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक- श्री. रमाकांत हंसराज ठाकरे

अनुमोदक- श्री. रामनाथ कचरु वाबळे

विषय क्र. १० : पुढील वर्षी फेब्रुवारी-२०१७ मध्ये होणाऱ्या नॅक मुल्यांकना-बाबत विचारविनीमय करणे.

ठराव क्र. ११ : उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी व त्याचे मुल्यमापन होण्यासाठी केंद्रसरकारच्या व युजीसीच्या नियमानुसार नॅक तृतीय मुल्यांकनाची प्रक्रीया पूर्ण करण्यात यावी असा ठराव ही सभा संमत करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक- श्री. प्रदीपकुमार रघुनाथ भदाणे

अनुमोदक- श्री. भास्करराव बबनराव नायकर

विषय क्र. ११ : एम.एस्सी (फिजीक्स) सुरु करणेबाबत विचारविनीमय करणे.

ठराव क्र. १२ : महाविद्यालयात एम.एस्सी. (फिजीक्स) सन २०१८-१९ पासून सुरु करण्यासाठी प्रस्ताव करण्यात यावा. तसेच टि.वाय.बी.एस्सी. (बॉटनी) - एफ.वाय.बी.एस्सी. दुसरी तुकडीयुक्त करण्याचाही प्रस्ताव करण्यात यावा असा ठराव ही सभा मंजूरी करीत आहे.

PAGE No.
DATE

ठराव सर्वानुमते मंजूर
सूचक - श्रीमती शकुंतला नाना फुरक
अनुमोदक - श्री. रत्नाकर विनायक कदम

विषय क्र १२ : मा. अध्यक्षांचे परवानगी घेऊन येणाऱ्या विषयांवर करणे.

ठराव क्र. १३ : महाविद्यालयाचे दर्शनी भागास महाविद्यालयाचे नाव नसल्याने नवीन ॲक्रेलिकचे नाव टाकण्यात यावे असा ठराव ही सभा मंजूर करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर
सूचक - श्री. रमाकांत हंसराज पाटील
अनुमोदक - श्री. भास्करराव बबनराव गाय

प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.पी. पाटील यांनी युजीसीचे रु. ६१८७०००/- व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बीसीयुडीकडून रु. १००००००/- अनुदान मिळाल्याची माहिती दिली. तसेच महाविद्यालयात रेडिओ फ्रिक्वेन्सी इंटरनेट सुविधा सुरू केल्याची माहिती दिली. तसेच ज्युनिअर कॉलेजचे कबड्डी संघाचे दोन खेळाडू विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर खेळल्याची माहिती दिली, त्याबद्दल त्या दोन खेळाडूंचे व खेळ शिक्षक श्री. पी.व्ही. खाडे यांचे अभिनंदन करण्यात आले.

सभेपुढील चर्चेचे विषय समाप्त झाल्याने उपस्थितांचे उपप्राचार्या श्रीमती. एस.टी. वाघ यांनी संस्थेच्या सरचिटणीस मा. श्रीमती निलिमाताई पवार, संस्थेचे कार्यकारी मंडळ व उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने कामकाज संपल्याचे जाहीर केले.

वाचून मंजूर
दि ९/२/२०१८

Pawar